प्रेषक :
अमर हिंद मंडळ, दादर
गोखले पथ (उत्तर),
दादर, मुंबई - ४०० ०२८.

श्री./श्रीमती

बुक - पोस्ट

गणेश प्रिंटर्स, ४१, शास्त्री बिल्डिंग ज्ञान मंदिर रोड दादर मुंबई - ४०० ०२८.
फोन - ४३७ ८६ ८८

# अमर हिंद मंडळ, दादर,

## मुंबई ४०० ०२८.

(स्थापना : १९४७)

(सार्वजनिक विश्वस्त नोंद क्रमांक एफ ४३ (मुंबई)
संस्था विधी नोंद क्रमांक १७८६/२५६ १९४९)

# त्रैवार्षिक अहवाल

## १ एप्रिल १९९० ते ३१ मार्च १९९३

अमरवाडी
गोखले पथ (उत्तर)
दादर, मुंबई ४०० ०२८
दूरध्वनी : ४२२ ३५ ८९

# अमर हिंद मंडळ, दादर

१ एप्रिल १९९० ते २० डिसेंबर १९९०

विश्वस्त : श्री. ना.के. पडते
डॉ. सुहास कुलकर्णी
श्री. शि.धों. वेलणकर

अध्यक्ष : बॅ. विठ्ठलराव न. गाडगीळ
उपाध्यक्ष : श्री. म.पु. काटधरे

## कार्यकारी समिती

| | | |
|---|---|---|
| कार्याध्यक्ष | : | श्री. मु.आ. तिवरेकर |
| कार्योपाध्यक्ष | : | श्री. ह.गं. राणे |
| कार्यवाह | : | श्री. न.ज. मयेकर |
| संयुक्त कार्यवाह | : | श्री. श्री.का. भोसले |
| कोषाध्यक्ष | : | श्री. उ.व्यं. शेणॉय |

## सभासद

श्री. गो.स. आवसक
श्री. कि.आ. पालेकर
श्री. श्री.सि. पुराणिक
श्री. वि.शं. मांढरे
श्री. अ.अ. भाताडे
श्री. स.श. रेडीज
श्री. य.गो. कामत
श्री. चिं.वि. नागले
श्री. शां.ह. शिरवडकर
श्री. ए.ना. साटम

# अमर हिंद मंडळ, दादर,
# मुंबई - ४०० ०२८

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

अमर हिंद मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ३०/१/९४ रोजी सकाळी १०.०० वाजता मंडळाच्या सभागृहांत, अध्यक्ष मा. डॉ.पा.वि. चंद्रात्रेय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यांत आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

## सभेपुढील कामे

१. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२. त्रैवार्षिक अहवाल मंजूर करणे.
३. हिशेब व ताळेबंद (सन् १९९०-९१, १९९१-९२ व १९९२-९३ सालचे) मंजूर करणे.
४. हिशेब तपासनिस नेमणे व त्याचे मानधन ठरविणे.
५. अंदाजपत्रक मंजूर करणे.
६. इमारत निधीत रक्कम वर्ग करण्यांसाठी ठराव करणे.
७. विश्वस्त मा.श्री. ना. के. पडते यांच्या राजीनामापत्रावर निर्णय घेणे.
८. अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि कार्यकारी समितीच्या सभासदांची ३ वर्षासाठी निवड करणे. (निवडणुकीचा तपशीलवार कार्यक्रम स्वतंत्र परिपत्रकाद्वारे पाठविण्यांत आलेला आहे.
९. मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेपुढे येणाऱ्या अन्य विषयांचा विचार करणे.

कार्यकारी समितीच्या अनुमतीने
**उमेश व्यं शेणॉय**
**कार्यवाह**

दिनांक १/१/९४

**सूचना :** १) गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास घटना नियमानुसार त्याचदिवशी त्याच ठिकाणी १/२ तासानंतर सभा होईल.

२) सभासदांना हिशेबासबंधी माहिती हवी असल्यास ती कार्यालयीन वेळेत (सायंकाळी ६ ते ८) गुरुवार दिनांक १३ जाने. १९९४ पर्यंत मिळेल.

३) ज्या सभासदांना प्रश्न विचारावयाचे असतील. त्यांनी ते लेखी स्वरुपांत शनिवार दिनांक १५ जानेवारी १९९४ पर्यंत मंडळाच्या कार्यालयांत सायंकाळी ६ ते ८ पर्यंत (रविवार सोडून) आणून द्यावेत.

४) ज्या सभासदांचे पत्ते बदलते असतील त्यांनी त्यांचे बदललेले पत्ते त्वरीत कळवावे. तसेच जे सभासद हयात नसतील अशा सभासदांच्या वारसांनी / संबंधितांनी मंडळास तद्संबंधीची माहिती त्वरीत कळवावी.

# त्रैवार्षिक अहवाल

## (दि. १-४-१९९० ते ३१-३-१९९३)

**सन्माननीय सभासद बंधुभगिनींनो,**

**सादर वन्दे.**

मंडळाचा दि. १-४-१९९० ते दि. ३१-३-१९९३ या काळातील कार्याचा अहवाल तसेच त्रैवार्षिक जमाखर्च व ताळेबंद पत्रके आपणास सादर करण्यास कार्यकारी समितीस आनंद होत आहे.

या कालावधीत मंडळाने नेहमीचे सामाजिक शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम कार्यवाहीत आणले. आणि आपणा सर्वांचा यथायोग्य प्रतिसादहि त्यास लाभलेला आहे.

प्रत्येक वर्षाचा कार्याचा अहवाल खालीलप्रमाणे

### दि. १ एप्रिल १९९० ते दि. ३१ मार्च १९९१

दि. १६ डिसेंबर १९९० पर्यंत अस्तित्वांत असलेल्या कार्यकारी समितीने वेळोवेळी अनेक उपक्रम हाती घेवून व ते यशस्वी रितीने पार पाडून अमर हिंद मंडळाने उज्ज्वल ठेवण्याचा प्रयत्न केलेला होता. त्याचबरोबर मंडळाची आर्थिक घडीहि व्यवस्थित बसविण्यांत त्यांचा महत्त्वाचा हातभार होता.

मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा, कार्यकारी समितीची त्रैवार्षिक निवडणूक तसेच अध्यक्ष, दोन उपाध्यक्ष आणि तीन विश्वस्तांची सहा वर्षासाठीची निवडणूक दि. १६ डिसेंबर १९९० रोजी घेण्यांत आली. या निवडणुका अविरोध झाल्या.

नवीन कार्यकारी समिती दि. २० डिसेंबर १९९० पासून कार्यरत झाली व पूर्वीच्या कार्यकारी समितीने आखून दिलेल्या मार्गानेच परंतु काही वेळा थोडयाशा निराळया मार्गाने प्रगतीच्या दृष्टीकोनातून वाटचाल करु लागली.

**तहहयात सभासद नोंदणी :** वरील अहवाल काळांत एकूण १३२ जणांना मंडळाचे तहहयात सभासद करुन घेण्यांत आले. विश्वस्तांबरोबर झालेल्या संयुक्त सभेत सर्वसाधारण सभेत यासंबंधीचा अंतिम निर्णय होईपर्यंत यापुढे असे सभासद न नोंदविण्याचे सर्वानुमते ठरविण्यांत आले.

**कॅटरिंग व्यवस्था :** दि. ३१ डिसेंबर १९९० पर्यंत श्री. गणेश केटरर्स यांनी मंडळात होणाऱ्या विविध कार्यांचे आणि समारंभाचे कॅटरिंग सांभाळले. त्यानंतर कार्यकारी समितीने सदरहू कॅटरिंग व्यवस्था बंद करुन फक्त भांडी व डेकोरेटर्स यांची ठेकेदारी, निविदा मागवून त्यानुसार "प्रकाश डेकोरेटर्स" यांना दिली.

**देणगी :** अहवाल काळात 'अॅकवर्थ लेप्रसि' या मान्यवर सामाजिक संस्थेला रु.६०२/-. आणि पीपल्स एज्युकेशन सोसायटीला रु. ५०१/- ची देणगी मंडळातर्फे देण्यांत आली.

**वसंत व्याख्यानमाला :** मंडळाची ४३ वी वसंत व्याख्यानमाला रविवार दि. २२ एप्रिल ते बुधवार दि. २ मे १९९० पर्यंत आयोजित करण्यांत आली होती. या व्याख्यानमालेत एकूण अकरा कार्यक्रम सादर करण्यांत आले.(परिशिष्ट १ पहा) श्रोत्यांची उपस्थिती समाधानकारक होती. व्याख्यानमाला विनामूल्य होती.

**अक्युप्रेशर सेवा :** मंडळातर्फे विनामूल्य अॅक्युप्रशर सेवा दि. २१ ऑगस्ट १९९० पर्यंत सर्वश्री हिम्मतभाई भट, खंडेराव ढगे, अनिल डांगे आणि प्रा. बर्वे यांनी दर रविवारी अव्याहतपणे चालू ठेवली होती. परंतु या विभागाचे प्रमुख श्री. हिम्मतभाई भट यांनी वैयक्तिक कारणामुळे सदर विभागाच्या जबाबदारीसंबंधी असमर्थता व्यक्त केल्याने विभाग कार्यकारी समितीच्या अनुमतीने तात्पुरता बंद करण्यात आला.

**इमारत निधी :** मंडळाच्या इमारत निधीमध्ये वरील काळांत एक लाख रुपये वर्ग करण्यांत आले.

**क्रीडा विभाग :** मंडळाच्या महिला व पुरुष खोखो संघांनी तसेच महिला कबड्डी संघाने अहवाल काळांत जिल्हा, राज्य तसेच अखिल भारतीय स्पर्धामध्ये नेहमीप्रमाणे चमक दाखविली. खेळाडूंना सर्वश्री विजय राणे, विष्णु हरमले, संजय पेडणेकर, संजीव ठाकूरदेसाई आणि जयसिंग डांगे यांचे समर्थ मार्गदर्शन लाभले.

याच कालावधीमध्ये मुंबई खोखो संघटनेच्या अध्यक्षपदी मंडळाचे तहहयात सभासद श्री शंकरराव साळवी यांची, श्री. ए.ना. साटम यांची कार्योपाध्यक्षपदी तर श्री. उमेश शेणॉय यांची उपाध्यक्षपदी निवड झाली.

दि. १ जानेवारी १९९१ ते दि. ३१ जानेवारी १९९१ या दरम्यान तरुण उत्साही मंडळ, दित्रस (महाराष्ट्र) यांच्या वतीने झालेल्या सुवर्ण महोत्सवी अखिल भारतीय कबड्डी स्पर्धेमध्ये आपल्या महिला संघाने अंतिम विजय मिळवून सुवर्ण चषक व अजिंक्यपद पटकाविले आणि मंडळाच्या किर्तीत भर घातली. याच स्पर्धेत 'कु. सुचित्रा शिवलकर' हिला सर्वोत्कृष्ट पकडीचे पारितोषिक मिळाले. क्रीडा क्षेत्रातील सहभागाबद्दलची इतर काही ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

* कलकत्ता येथे झालेल्या शालेय राष्ट्रीय स्पर्धेत कु. अर्चना मयेकर हिचा महाराष्ट्राच्या संघातून समावेश करण्यात आला.

* मुंबई शहर कबड्डी संघातून कु. सुचित्रा शिवलकर हिची राज्य अजिंक्यपद व चांचणी स्पर्धेसाठी तर कु. मनिषा पडवळ हिची महिला क्रीडामहोत्सवासाठी मुंबई शहर कबड्डी संघातून निवड झाली.

* धुळे येथे झालेल्या महिला क्रीडा महोत्सवांत मुंबईच्या खोखो संघातून कु. शिल्पा तोरणे, कु. अर्चना मयेकर, कु. नीलम साने व कु. उत्कर्षा शेणॉय यांनी सहभाग घेतला होता.

* औरंगाबाद येथे झालेल्या फेडरेशन चषक स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचा खोखो संघातून कु. अर्चना मयेकर हिचा सहभाग होता.

* अहमदनगर येथे झालेल्या राज्य अजिंक्यपद व चांचणी खोखो स्पर्धेत कु. अभ्युदय मुंज यांची कुमारगटातून मुंबई खोखो संघातून निवड झाली होती.

* किशोरी गटांत राज्य अजिंक्यपद व चांचणी स्पर्धेत कु. किर्ती शिवलकर, कु. रोहिणी जेधे व कु. सविता राणे यांची मुंबई खोखो संघातून निवड झाली होती.

* नोव्हेंबर १९९० मध्ये पुणे येथे झालेल्या आंतरविद्यापिठीय खोखो स्पर्धेत कु. नीलम साने हिने मुंबई विद्यापिठाचे प्रतिनिधित्व केले.

* डिसेंबर १९९० मध्ये मुंबईत झालेल्या राज्य अजिंक्यपद व चांचणी स्पर्धेत कु. अर्चना मयेकर, कु. संगीता मोरे आणि कु. उत्कर्षा शेणॉय यांनी मुंबईचे प्रतिनिधित्व केले.

**कला विभाग :** सर्वश्री दत्ता सावंत, दिलीप दळवी, संजीव वढावकर इत्यादिकांच्या मार्गदर्शनाखाली कला विभागाने नाटयदर्पण प्रतिष्ठान आयोजित ''कल्पना एक आविष्कार अनेक'' स्पर्धा महाराष्ट्र राज्य नाटय स्पर्धा, नॉयझी एकांकिका स्पर्धा, नाटयदर्पण स्पर्धा, इत्यादि स्पर्धांतून भाग घेवून उत्तम कामगिरी बजावली. विसाव्या राज्य नाटय महोत्सवांत मंडळाच्या कलाविभागाने सादर केलेल्या ''चिमणीच्या नखांन'' या एकांकिकेत 'कु. प्रज्ञा जावळे' हिस गार्गीच्या भूमिकेसाठी उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

**इतर कामे :** वरील कालावधीमधे सभागृहाचे रंगकाम, खुर्च्या, दरवाजे, सभागृह कपाटे इत्यादींची दुरुस्ती करण्यांत आली. त्याचप्रमाणे पाण्याच्या अपुऱ्या पुरवठयावर मात करण्यासाठी पाण्याची नवीन मोठी जोडणी करण्यांत आली.

## दि. १ एप्रिल १९९१ ते दि. ३१ मार्च १९९२

**सभा :** अहवाल काळांत विश्वस्त व कार्यकारी समिती यांची फक्त एक संयुक्त सभा झाली तर कार्यकारी समितीच्या दैनंदिन कामासाठी एकूण अकरा सभा झाल्या.

**कॅटरिंग व्यवस्था :** दि. १ जुलै १९९१ ते दि. ३१ जाने. १९९२ या काळासाठी 'गुरुदत्त कॅटरर्स' यांना ठेकेदारी देण्यात आली होती. तर उर्वरित काळासाठी 'मे. विनय कॅटरर्स' यांना रितसर निविदा मागवून आणि चर्चा करुन ठेकेदारी देण्यांत आली.

**तहहयात सभासद :** या कालावधीत एकहि नवा तहहयात सभासद नोंदविण्यांत आला नाही.

**वसंत व्याख्यानमाला :** मंडळाची ४४ वी वसंत व्याख्यानमाला रविवार दि. २१/४/९१ ते मंगळवार दि. ३०/४/९१ या दरम्यान अकरा कार्यक्रमांनी संपन्न झाली (परिशिष्ट २ पहा.)

यंदाच्या वसंत व्याख्यानमालेचा कार्यक्रम ठरविण्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर डॉ.पां.वि. चंद्रोदय (अध्यक्ष) श्री. वि.शं. मांढरे (कार्योपाध्यक्ष) श्री. धों. वि. देशपांडे, सौ. उषा मेहता, श्री. किशोर रांगणेकर यांची एक सल्लागार समिति नेमण्यांत आली होती. या व्याख्यानमालेचे 'व्हिडिओ शुटींग' करण्यांत आले. विशेष म्हणजे कार्यक्रमाची वेळ रात्रौ ९ ऐवजी सायंकाळी ७ अशी करण्यांत आली. व त्याचा परिणाम कार्यक्रमाला भरघोस प्रतिसाद मिळण्यांत झाला. प्रवेश विनामूल्य होता.

**क्रीडाविभाग :** सर्वश्री विजय राणे, विष्णू हरमले, संजीव ठाकूरदेसाई, रमेश नाटेकर, संजय पेडणेकर इत्यादिंच्या मार्गदर्शनाखाली आपल्या कबड्डी (महिला) व खोखो (पुरुष व महिला) संघांनी जिल्हा राज्य व अखिल भारतीय स्तरांवरील विविध स्पर्धांमध्ये भाग घेवून आपले सातत्य कायम राखले.

मंडळाच्या वतीने दि. १३ ते दि. १९ एप्रिल १९९१ या दरम्यान इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या सावित्रीबाई फुले मुलींच्या शाळेच्या व मुख्याध्यापिका सौ. उषा मेहता यांच्या सहकार्याने खोखो व कबड्डी शिबीर आयोजित करण्यांत आले होते. यांतील खेळाडूंना दैनंदिन नास्ता व दूध मंडळाने संयुक्त कार्यवाह श्री अनंत भालेकर आणि कार्यकारी मंडळ सदस्य श्री. चारुदत्त थरवल यांनी विनामूल्य देण्याची व्यवस्था केली. या शिबीरांत एकूण ५३ खेळाडूंनी भाग घेतला.

**इतर ठळक वैशिष्ट्ये :**

* कु. अर्चना मयेकर हिची राज्य खोखो शालेय संघातून राष्ट्रीय स्पर्धेसाठी तसेच कलकत्ता येथे झालेल्या खुल्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी तिची आणि कु. उत्कर्षा शेणॉय यांची निवड झाली होती.

* अक्कलकोट, सोलापूर येथे झालेल्या राज्य खोखो चांचणी व अजिंक्यपद स्पर्धेत सहभागी झालेल्या मुंबई जिल्हा संघातून कु. अर्चना मयेकर, कु. उत्कर्षा शेणॉय व कु. अपर्णा वैद्य यांची संघाचे सदस्य म्हणून निवड झाली.

* वेंगुर्ला येथे जानेवारी १९९२ मध्ये झालेल्या कुमार-मुली राज्य अजिंक्यपद चांचणी खोखो स्पर्धेत मुंबईच्या संघातून कु. सचिन खानविलकर, कु. स्वाती घरत आणि कु. आदिती कांबळे, यांनी प्रतिनिधित्व केले.

* हैद्राबाद येथे झालेल्या फेडरेशन चषक खोखो स्पर्धेत कु. शिल्पा तोरणे हिची महाराष्ट्राच्या संघातून निवड झाली होती.

* कै. बाबासाहेब जामसांडेकर स्मरणार्थ झालेल्या मुंबई जिल्हा अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत कु. रत्नप्रभा धुरे हिला उत्कृष्ट चढाईचे पारितोषिक मिळाले.

* कु. सुचित्रा शिवलकर हिची मुंबई जिल्हा कबड्डी संघातून निवड झाली.

* जिल्हा खोखो संघ निवडण्यासाठी नेमलेल्या निवडसमितीवर कु. उषा मोरे आणि श्री. अनंत भाताडे (मुली) व संजीव ठाकुरदेसाई (किशोरी) या आपल्या सदस्यांना काम करण्याचा बहुमान प्राप्त झाला.

* महिला कबड्डी संघाने 'सांगली' येथे झालेल्या अखिल भारतीय कबड्डी स्पर्धेत व पांचगणी, येथे झालेल्या राज्य स्तरीय स्पर्धेत भाग घेतला. तसेच महिला खोखो व कबड्डी संघांनी सोलापूर येथील महापौर चषक स्पर्धेतहि भाग घेतला.

* मंडळाचे संयुक्त कार्यवाह श्री. अनंत भालेकर यांनी मंडळाच्या महिला कबड्डी संघातील १२ खेळाडूंना संचलनासाठी लागणारे सफेद स्कर्टस् देणगी दाखल दिले.

**कलाविभाग :** कलाविभागाने पु.भा. भावे एकांकिका स्पर्धेत भाग घेतला.

**देणगी :** 'ॲक्वर्थ लेप्रसी' या संस्थेस रु. ५०१/- (पांचशे एक फक्त) आणि 'सानेगुरुजी कथामाला' या संस्थेस मंडळातर्फे रु. ५१/- (एक्कावन्नफक्त) मंडळातर्फे देणगीस्वरुपात देण्यांत आल्या.

**इमारत निधी :** अहवाल काळात इमारत निधीमध्ये रु. ७५.०००/- (रुपये पंचाहत्तर हजार फक्त) वर्ग करण्यांत आले.

**इतर** * कामाचा वाढता व्याप लक्षांत घेवून सकाळी ८.३० ते ११.३० आणि सायंकाळी ६ ते ८ या वेळेसाठी अर्धवेळ व्यवस्थापकाची नेमणूक करण्यांत आली.

* मंडळाचा माळी श्री. अर्जुन कुले आणि सफाई कामगार श्री. गमरे यांना भरीव पगारवाढ देण्यांत आली.

* अहवालकाळांत दर्शनी दरवाजा, शौचालये, ड्रेनेज नुतनीकरण इ. कामे करण्यांत आली.

## १ एप्रिल १९९२ ते ३१ मार्च १९९३

**सभा :** अहवाल काळामध्ये कार्यकारी समितीच्या एकूण आठ तर कार्यकारी समिती व विश्वस्त यांच्या एकूण दोन संयुक्त सभा झाल्या.

**तहहयात सभासद :** या कालावधीत एकही सभासद नोंदविण्यात आला नाही.

**वसंत व्याख्यानमाला :** मंडळाची ४५ वी वसंत व्याख्यानमाला सोमवार दिनांक २७/४/९२ ते रविवार दिनांक ३/५/९२ या दरम्यान एकूण सात कार्यक्रमांनी संपन्न झाली (परिशिष्ट ३ पहा.)

**कॅटरिंग :** दि. १-१-९३ ते दि. ३१-१२-९३ या कालावधीसाठी 'सुलभ कॅटरर्स' यांना निविदा मागवून नेहमीच्या पध्दतीने ठेकेदारी देण्यांत आली.

**क्रीडाविभाग :** मंडळाच्या खोखो व कबड्डी संघाने सर्वश्री प्रफुल्ल पाटील, संजय पेडणेकर, विष्णू हरमले, संजीव ठाकूरदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली आपली परंपरा कायम राखली.

जिल्हा स्तरीय स्पर्धाबरोबरच राज्यस्तरीय व अखिल भारतीय स्पर्धात खेळण्याचा मान आपल्या खोखो आणि कबड्डी संघानी मिळविला.

इतर ठळक विशेष खालीलप्रमाणे :

* सोलापूर महापौर चषक स्पर्धेमध्ये मंडळाच्या महिला खोखो व कबड्डी संघानी भाग घेतला.

* नासिक येथे झालेल्या राज्यस्तरीय कुमार गटांच्या खोखो स्पर्धेत मंडळाच्या कु खोखो संघाने उपान्त्य फेरीपर्यंत धडक मारली.

* धुळे येथे झालेल्या महिला क्रीडामहोत्सवांर्गत खोखो चांचणी व अजिंक्यपद स्पर्धेत मुंबईच्या संघाचे कु. अर्चना मयेकर, कु. अपर्णा वैद्य, व कु. उत्कर्षा शेणॉय यांनी प्रतिनिधित्व केले. कु. अर्चना मयेकर हिची येथे राज्याच्या संघातून राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली.

* बंगलोर व कलकत्ता येथे झालेल्या महिला गटाच्या आंतरविद्यापिठीय खोखो स्पर्धेत कु. अपर्णा वैद्य व कु. उत्कर्षा शेणॉय यांनी मुंबई विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले. या संघाच्या शिक्षकपदी कु. उषा मोरे यांना नेमण्यांत आले होते.

* सावंतवाडी येथे झालेल्या राज्य महिला कबड्डी चांचणीसाठी मुंबईतून कु. रत्नप्रभा धुरे हिची निवड झाली होती. मुंबई महापौर चषक कबड्डी स्पर्धेत तीला 'वुमन ऑफ द डे' चा बहुमान मिळाला.

* मुंबई जिल्हयाच्या खोखो निवड समितीवर सर्वश्री अनंत भाताडे व संजीव ठाकूरदेसाई यांची अनुक्रमे पुरुष आणि महिला विभागावर निवडणूक सदस्य म्हणून नेमणूक जिल्हा संघटनेतर्फे करण्यांत आली होती.

**कलाविभाग :** सर्वश्री संजीव वढावकर.दिलीप दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली आप कलाविभागाने महाराष्ट्र राज्य नाटय महोत्सरांत 'पाचोळा' हे नाटक सादर केले तर नेहरु सेंटर पुरस्कृत 'नाटयदर्पण' एकांकिका स्पर्धेत असे घडते तर? ही एकांकिका सादर केली. वरील स्पर्धेत अनुक्रमे श्री हेमंत भालेकर आणि श्री संजीव वढावकर यांना उत्तेजनार्थ प्रमाणपत्रे देण्यांत आली.

**इमारत निधी :** अहवाल काळांत रु. १,२५,०००/- (एक लाख पंचवीस हजार फक्त) इमारत निधीमध्ये वर्ग करण्यांत आले.

**इतर :** वाढत्या महागाईमुळे दि. १-१-९३ पासून नाईलाजाने सभागृह व व्हीडीओ शुटींग दरात वाढ करण्यांत आली.

## श्रध्दांजली :

या तीन वर्षाच्या कालावधीत मंडळाचे तहहयात सभासद 'जयंत मेस्त्री' व 'दिगंबर भोसले' यांचे निधन झाले. त्यांना, तसेच अज्ञात कैलासवासी तहहयात सभासदांना कार्यकारी समितीची श्रध्दांजली.

## भविष्यकालीन योजना :

मंडळाची भव्य वास्तू उभारुन त्यांत सुसज्ज व्यायामशाळा, स्वास्थ केंद्र, मुलांसाठी अभ्यासिका इ. नवीन उपक्रम सुरु करण्याचा मनोदय आहे. तसेच देशी-विदेशी खेळांसाठी स्तीत जास्त उत्तेजन देण्यासाठी विविध स्पर्धा, सेमिनार इ. आयोजित करण्याचे तसेच दर महिन्याची प्रासंगिक व्याख्यानमालाहि सुरु करण्याचा विचार आहे.

या सर्वासाठी व मंडळाच्या उत्तरोत्तर प्रगतीसाठी आपले सहकार्य अपेक्षित आहे.

धन्यवाद.

आपले नम्र,

उमेश व्यं शेणॉय
कार्यवाह,
कार्यकारी समितीसाठी.

परिशिष्ट १.

## - वसंत व्याख्यानमाला -

### वर्ष ४३ वे

रविवार दिनांक २२ एप्रिल ते बुधवार दिनांक २ मे १९९०

— रोज रात्री ९-१५ वाजता —

- कार्यक्रम -

| | | |
|---|---|---|
| रविवार दि. २२-४-९० | उद्घाटन : डॉ.यू.म. पठाण (अध्यक्ष : अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन) | "ज्ञानदेवे रचिला पाया" |
| सोमवार दि. २३-४-९० | डॉ.यू.म. पठाण यांची मुलाखत | मुलाखतकार डॉ. निर्मलकुमार फडकुले (सोलापूर) |
| मंगळवार दि. २४-४-९० | डॉ. निर्मलकुमार फडकुले (सोलापूर) | "ज्ञानेश्वरांचा प्रतिभाविलास" |
| बुधवार दि. २५-४-९० | प्रा. मुरलीधर सायनेकर | "श्रध्दा आणि आधुनिक जीवन" |
| गुरुवार दि. २६-४-९० | प्रा. राम जोशी | "अस्थिरता- जागतिक आणि भारतीय" |
| शुक्रवार दि. २७-४-९० | डॉ. शशिकुमार चित्रे, डॉ. अच्युत थत्ते आणि श्री. हेमंत मोने<br>संयोजक : डॉ. पां.वि. चंद्रात्रेय | "वैज्ञानिक गप्पा" |
| शनिवार दि. २८-४-९० | श्री. सुरेश खरे | "आकाशवाणी, दूरदर्शन आणि रंगभूमी- फरक माध्यमाचा" |
| रविवार दि. २९-४-९० | सहभाग श्री. आकाशानंद<br>डॉ. श्रीमती किरण चित्रे<br>श्रीमती नीना राऊत आणि<br>श्री. शिवाजी फुलसुंदर<br>संयोजक : डॉ. पां.वि. चंद्रात्रेय | "दूरदर्शनविषयी प्रश्नो." |
| सोमवार दि. ३०-४-९० | श्री. सु.गं. शेवडे | "हिंदुधर्म व हिंदुत्व" |
| मंगळवार दि. १-५-९० | श्री. बापू वाटवे | "प्रभात काळ चित्रपट सृष्टीचा" |
| बुधवार दि. २-५-९० | डॉ. दिलीप धारे, प्रा. यशवंत देशमुख | "गाजराची पुंगी" (नाविन्यपूर्ण कार्यक्रम) |

परिशिष्ट २.

## - वसंत व्याख्यानमाला -

### वर्ष ४४ वे

रविवार दिनांक २१ एप्रिल ते मंगळवार दिनांक ३० एप्रिल १९९१

- कार्यक्रम -

| | |
|---|---|
| रविवार दिनांक २१-४-९१ | उद्घाटन संध्याकाळी ७ वाजता<br>उद्घाटक : पद्मश्री श्री. माधवराव गडकरी<br>विषय : "राष्ट्राध्यक्ष पध्दती व स्वायत्त महाराष्ट्र" |
| सोमवार दिनांक २२-४-९१ | डॉ. यशवंत पाठक<br>विषय : "तुका म्हणे जाऊ वैकुंठा चालत" |
| मंगळवार दिनांक २३-४-९१ | श्री. मुझफ्फर हुसेन<br>विषय : "मुलाखत" मुलाखतकार श्री. बापू वाटवे |
| बुधवार दिनांक २४-४-९१ | श्री. शरद तळवलकर , मधू आपटे<br>विषय : "मुलाखत" मुलाखतकार श्री. बापू वाटवे |
| गुरुवार दिनांक २५-४-९१ | बॅ.पी.जी. पाटील ,<br>विषय : "स्पर्धात्मक परीक्षा" : तरुण तरुणींना आव्हान |
| शुक्रवार दिनांक २६-४-९१ | श्री. मिलींद गाडगीळ<br>विषय : "आखाती युध्द व भारत" |
| शनिवार दिनांक २७-४-९१ | लेफ्ट कर्नल श्री. शाम चव्हाण<br>विषय : "भारताची युध्दसज्जता" |
| रविवार दिनांक २८-४-९१<br>(सकाळी १० वाजता)<br>मुलांसाठी खास कार्यक्रम | कु. महेश माने व श्री. विवेक मेहेत्रे<br>विषय : मानवी संगणक व यांत्रिक संगणक |
| रविवार दिनांक २८-४-९१ | सौ. स्मिता तळवलकर, सौ. लालन सारंग,<br>श्री. दिलीप प्रभावळकर व श्री. मच्छिंद्र कांबळी.<br>विषय : "मुलाखत" मुलाखतकार श्री. अजित भुरे |
| सोमवार दिनांक २९-४-९१ | आमदार श्री. प्रमोद नवलकर व अरविंद इनामदार<br>(सहपोलिस आयुक्त, मुंबई) |

विषय : "मुंबईतील गॅंगवार"

| | |
|---|---|
| मंगळवार दिनांक ३०-४-९१ | सौ. मोहना चितळे (पुणे)<br>विषय : "पसायदान" |

परिशिष्ट ३.

## - वसंत व्याख्यानमाला -

### वर्ष ४५ वे

सोमवार दिनांक २७ एप्रिल ते रविवार दिनांक ३ मे १९९२

- कार्यक्रम -

| | |
|---|---|
| सोमवार दिनांक २७-४-९२ | उद्‌घाटन संध्याकाळी ७ वाजतां<br><br>उद्‌घाटक : श्री. गोविंद तळवलकर<br>(संपादक महाराष्ट्र टाईम्स)<br>विषय : **"इतिहासांतील काही भ्रम"** |
| मंगळवार दिनांक २८-४-९२ | श्री. वसंत पोतदार<br>विषय : **"संन्यासी योध्दा-स्वामी विवेकानंद"** |
| बुधवार दिनांक २९-४-९२ | श्री. दिनकर गांगल<br>विषय : **"संस्कृतिकारण"** |
| गुरुवार दिनांक ३०-४-९२ | अभिनेते श्री. निळू फुले<br>विषय : **"माझ्या भूमिका व मी"** (मुलाखत)<br>मुलाखतकार श्री. वसंत भालेकर |
| शुक्रवार दिनांक १-५-९२ | डॉ. ज. अरविंद चौककर<br>विषय : **"हृदय शस्त्रक्रिया : सद्य : परीस्थिती"** |
| शनिवार दिनांक २-५-९२ | स्वामी स्वरुपानंद<br>विषय : **"मानवी जीवनाचा विकास व आध्यात्म"** |
| रविवार दिनांक ३-५-९२ | डॉ. अशोक मोडक<br>विषय : **"रशियाचे विघटन व भारत"** |

# अमर हिंद मंडळ, दादर

२० डिसेंबर १९९० ते ३१ मार्च १९९३


**विश्वस्त** : श्री. ना.के. पडते
श्री. ज.शं. परब
श्री. दि.शं. पाटील

**अध्यक्ष** : डॉ. पां.वि. चंद्रात्रेय
**उपाध्यक्ष** : श्री. ह.गं. राणे
श्री. ए.ना. साटम

**कार्यकारी समिती**

कार्याध्यक्ष : श्री. श्री.का. भोसले
कार्योपाध्यक्ष : श्री. वि.शं. मांढरे
कार्यवाह : श्री. उ.व्यं. शेणॉय
संयुक्त कार्यवाह : श्री. अ.गं. भालेकर
कोषाध्यक्ष : श्री. स.श. रेडीज

**सभासद :**

श्री. वि.अ. कानविंदे
श्री. अ.अ. देशपांडे
श्री. चा.शं. थरवल
श्री. न.ह. राणे
श्री. अ.दि. पाटील
श्री. सं.ग. ठाकूरदेसाई
श्री. चिं.वि. नागले (स्वीकृत १०-१-९१ पासून)
श्री. ना.रा. नाबर (स्वीकृत १४-४-९१ पासून)
श्री. म.र. कुपेरकर (स्वीकृत १४-४-९१ पासून)